Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# महिला सबलीकरण: एक चिंतन

**डॉ. अंकुश अंबादासराव चव्हाण**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
तथा संशोधन मार्गदर्शक
मत्स्योदरी कला महाविद्यालय
तीर्थपूरी जि. जालना

स्त्री सबलीकरणाचा खरा अर्थ स्त्रीच्या बुध्दीमत्तेला निसर्गदत्त शक्तीला किंवा कार्यक्षमतांना सामर्थ्याला धारणक्षमतेला फुलविणे, तसेच स्वत:ची खरी ओळख, विचार स्वातंत्र्य, अभिव्यक्ती आणि कृती तसेच तिच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्राला हाताळण्याचे सामर्थ्य तिच्यात निर्माण करणे होय, केवळ त्यांना त्यांच्या क्षमतेची जणीव करून न देता त्या सोबत त्यांना संधी, सुविधा व बाह्य आणि आंतरीक वातावरण निर्माण करून देणे त्यांच्या जन्मजात गुणांचा वापर करून त्यांच्यात आत्मविश्वास विकसित करणे, स्वत:चा आधार आणि सामाजिक, मानसीक व आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होवून स्वयं प्रतिष्ठा प्राप्त करणे. तिच्या विरूध्द होणाऱ्या अन्याय व शोषणा विरूध्द आवाज उठविणे व संघर्ष करण्याची पात्रता निर्माण करणे होय.

स्त्री सबलीकरण या शब्दाची फोड केल्यास स्त्रीला सबल करणारी म्हणजे दुर्बलता नष्ट करणारी तीच्या शरीर, मन, बुध्दीत स्वत्वाची जाणीव व स्वत:बद्दल जागरूकता निर्माण करून त्या दृष्टीने स्वयंविकासासाठी प्रवृत्त करणारी एक संकल्पना होय. या दृष्टीने विकास, प्रगती व विविध क्षेत्रातील समान सहभाग व न्याय वागणुकी बाबत किंवा संपूर्ण समता व न्याय निर्मितीच्या दृष्टीने विश्लेषण करणारी संकल्पना होय हे तिचे स्वरूप आहे.

महिला सबलीकरण ही प्रक्रिया लिंगभेदावर आधारीत विषम समाज व्यवस्था नष्ट करून स्त्री— पुरूष समानतेवर आधारीत नवी व्यवस्था निर्माण करणारी आंतरराष्ट्रीय चळवळ आहे. महिलांच्या विकासासी संबंधित असणारी अबला महिलांना सबलकरून त्यांना पुरूषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रामध्ये समान संधी उपलब्ध करून देणे हे महिला सबलीकरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. महिलांना समान राजकीय आणि समाजिक अधिकार मिळवून देण्यावर या प्रक्रियेचा भर आहे. पुरूष प्रधान संस्कृतीमध्ये ऐतिहासीक काळापासून स्त्रीला जाणीवपुर्वक आणि पध्दतशीरपणे उपेक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. लिंग भेदावर आधिरीत विषमतेमधून स्त्रियांचे मोठ्या प्रमाणावर शोषण झाले परिणामी लिंगभेद आणि शोषणावर आधारीत सामाजिक, राजकीय आणि आर्थिक व्यवस्था बदलवुन स्त्रीला पुरूषाच्या बरोबरीने प्रगती आणि विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देणारी व्यवस्था निर्माण करण्याशी महिला सबलीकरणाची प्रक्रिया संबंधित आहे. ती एका चळवळीच्या रूपाने आंतरराष्ट्रीय पातळीवर विकसित झाली आहे. पुरूषांनी वर्षानुवर्षे स्त्रियांवर केलेल्या अन्यायाचा सुड उगविणे किंवा स्त्री प्रधान समाज व्यवस्था निर्माण करणे हा या प्रक्रियेचा उद्देश नाही. त्यांची मागणी ही समानतेची आहे. स्त्रीयांनी पुरूषा बरोबर समान संधी, स्थान, उर्जा व प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी व समाजामध्ये महिलांना उपेक्षित ठेवून **तिच्या शोषणासाठी जबाबदार असणाऱ्या शक्तीचे मतपरिवर्तन घडवून आणणे आवश्यक आहे. हा या प्रकियेचा मुळाशी असलेला विचार आहे.**

व्याख्या :–

**1) Country Report of Government of India :-**

**मध्ये म्हटल्या प्रमाणे, सबलीकरण म्हणजे बळजबरीने दुर्लक्ष ठेवण्याचा अवस्थेकडून शक्तीकडील वाटचाल होय. याव्दारे स्त्रियांमध्ये स्वतः बद्दलची सकारात्क प्रतिमा निर्माण होते व** त्यांच्या क्षमतेत वाढ होते.

**2) नाथ व चटर्जीच्या मते :–**

खऱ्या सबलीकरणासाठी विचारावरील नियंत्रण, तत्वावरील नियंत्रण, आणि आकलन शक्ती जी वैयक्तिक विश्वास किंवा श्रध्दांना तत्वांना आणि वृत्तीला आकार देते. आकलन विचार करणे जाणिव आणि विश्लेषण करण्याचा मार्ग होय. हे नियंत्रण निर्णय निर्धारणशक्तीत परावर्तीत होते ज्यातुन विविध मार्ग विस्तारतात व संसाधना वरील नियंत्रण निश्चित होते

**3) ग्रीफनच्या मते :–**

**स्त्रीच्या बाबतीत सत्ता या शब्दाचा अर्थ स्त्रीच्या सत्तेत वाढ होय तिचे नियंत्रण, तिचे ऐकणे, तिला समान नागरिक म्हणून मान्यता मिळणे, तसेच समाजात सक्रिय सहभाग घेण्याची पात्रता ही केवळ घरातच नव्हे तर समाजातील सर्वच स्तरवर सहभाग किंवा योगदान देण्याची क्षमता निर्माण करणे, सत्तेचा दुसरा अर्थ स्त्रीचा सहभाग अधिकृत व मुल्यवान करणे होय.**

**महिला सबलीकरणाचा अर्थ :–**

1. **महिलांनी पुरूषाच्या बरोबरीने विकास आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणे या प्रकियेत अपेक्षीत आहे.**
2. **महिला सबलीकरण ही महिला अधिकाराचा पुरस्कार करणारी आणि महिलाच्या विकासासी संबंधित प्रकिया आहे.**
3. **महिला सबलीकरण म्हणजे पुरूषांनी केलेल्या अन्यायाचा सुड उगविणे किंवा स्त्री प्रधान समाज** व्यवस्था निर्माण करणे नाही.

४. ही पक्रिया एका अशा व्यवस्थेच्या निर्मितीशी संबंधीत आहे ज्यामध्ये महिलांना समान स्थान, संधी, सत्ता प्रतिष्ठा मिळते.

५. महिला सबलीकरण हा पुरूषांच्या बरोबरीने समान राजकीय आणि सामाजिक अधिकार मिळण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर चाललेला संघर्ष आहे.

६. समाजामध्ये स्त्रियांना उपेक्षीत ठेवणाऱ्या त्यांना आर्थिक सामाजिक आणि राजकीय लाभापासून वंचीत ठेवणाऱ्या शक्तीमध्ये वैचारिक परिवर्तन घडवून आणने, अशा प्रवाहाची दिशा बदलणे महिला सबलिकरणामध्ये अपेक्षीत आहे.

७. स्त्रीयांच्या शारीरिक, मानसिक, आणि भावनीक जीवनाची गुणवत्ता सुधारणे त्याचप्राणे राजकीय, आर्थिक, समाजिक, आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये स्त्रीयांना पुरूषाच्या बरोबरीने समान हक्क आणि स्थान प्राप्त करून देणे हा महिला सबलीकरण प्रक्रियेचा मुख्य भाग आहे.

८. शारीरिक आणि मानसिक हिंसाचारापासून महिलांची मुक्तता करणे यामध्ये अपेक्षित आहे

**महिला सबलीकरण उद्देश :–**

**१. स्त्रि पुरूष समानता :–**

महिला सबलीकरण प्रक्रियेचे हे मुख्य उद्दीष्ट असुन त्याशिवाय महिलांचे सबलीकरण साध्य होवू शकणार नाही. पुरूष प्रधान संस्कृतिमधील लिंगभेदावर आधारित महिलांच्या शोषणाची पक्रिया नष्ट करून स्त्री पुरूष समानतेवर आधारित व्यवस्था निर्माण करण्यासाठी

स्त्रिवादी संघटना सक्रिय आहेत. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने विकासाच्या, प्रगतीच्या समानसंधी, प्रतिष्ठा, दर्जा सत्ता प्राप्त करून देणारी व्यवस्था निर्माण करणे हे महिला सबलीकरणाचे पुर्व अट आहे.

२. **स्त्रियांना आर्थिक आणि सामाजिक न्याय:—**

पुरूष प्रधान संस्कृतीमध्ये ऐतिहासिक काळापासून स्त्रियांना उपेक्षित ठेवण्यात आले. त्यांना मुलभूत, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय अधिकार नाकारण्यात आले. परिणामी स्त्रियांच्या बुध्दीमत्तेचा कार्यक्षमतेचा विकास होवू शकला नाही. स्त्रियांना आर्थिक आणि सामाजिक अधिकार मिळवून देवून त्यांचा विकास साधणे हे महिला सबलीकरण पक्रियेचे दुसरे महत्वाचे उद्दीष्ट आहे. आर्थिक आणि सामाजिक न्यायावर आधारित समाजव्यवस्थेची निर्मिती करणे महिला सबलीकरण प्रक्रियेत अभिप्रेत आहे.

३. **महिलांना रोजगाराभिमुख बनवुण आर्थिक सबलीकरण घडवून आणणे :—**

महिलांना आर्थिक अधिकार मिळवून देवून त्यांना रोजगारभिमुख बनविणे हे महिला सबलीकरण प्रक्रियेचे उद्दीष्ट आहे. स्त्री हा अर्थ व्यवस्थेचा महत्वाचा घटक आहे. स्त्रीला रोजगाराभिमुख बनविण्यातुन दोन गोष्टी साध्य होणार आहेत. एक म्हणजे राष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल आणि दुसरे म्हणजे स्त्री आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनेल. स्त्रीयांवरील अन्याय, अत्याचार कमी करण्यासाठी त्यांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनविणे आवश्यक आहे.

४. **राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभाग :—**

राजकीय निर्णय प्रक्रियेत महत्वाच्या स्थानावर पुरूषांचीच मक्तेदारी आहे. भारतामध्ये स्त्रीयांच्या राजकीय प्रक्रियेत सहभाग अत्यंत कमी आहे. राजकीय निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. कारण त्यातुन महिलांच्या कल्याणासाठी, विकासासाठी, विविध योजना आणणे, त्यांची अमंलबजावणी करणे शक्य होणार आहे. राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग वाढल्याने राजकारणातील वाढती गुन्हेगारी, भ्रष्टाचार कमी होण्यासाठी मदत होणार आहे.

५. **महिलावरील अन्याय अत्याचार दुर करणे :—**

पुरूष प्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार थांबविणे हे महिला सबलीकरण प्रक्रियेचे उद्दीष्ट आहे. आज स्त्रियांना वैवाहिक हिंसाचार, हुंडाबळी, बलात्कार, सक्तीचा वेश्या व्यवसाय, स्त्रियांची विक्री, लहान मुलींची हत्या, मारहाण, मादक पदार्थाची व्यसनाधिनता, आदि सारख्या शारीरिक व मानसीक छळांना सहन करावे लागत आहे. स्त्रीयांवर होणाऱ्या अन्याय अत्याचारापासून तिची मुक्तता करून विकास आणि प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देणे हा महिला सबलीकरण प्रक्रियेचा उद्देश आहे.

६. **मानसिक आणि बौध्दिक विकास :—**

स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढवून त्यांचा मानसिक आणि बौध्दिक विकास घडवून आणने हे महिला सबलीकरण प्रक्रियेचे आणखी एक महत्वाचे उद्दीष्ट आहे शिक्षणाव्दारे स्त्रियांमधील मानसिक व बौध्दीक क्षमतांचा विकास शक्य आहे. स्त्रियांमधील निरक्षरता हे स्त्रिया उपेक्षीत राहण्यामागचे एक महत्वाचे कारण आहे. परिणामी अधीकाधीक स्त्रियांना साक्षर बनवून त्यांचा मानसिक आणि बौध्दिक विकास घडवून आणणे

७. **महिला सामाजिक सबलीकरण :—**

महिला व मुलींना सारख्या प्रकारचे शिक्षण दिले जाईल महिलांच्या प्रती विषमता विश्वव्यापी शिक्षण, निरक्षता निर्मुलन शिक्षणात लिंगभेद संवेदनशील शिक्षण पध्दती मध्ये

वाढ मुलींच्या जन्मदरात वाढ व शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा या विषयी विशेष प्रयत्न केले जातील शिक्षणत लिंग भेदभाव असमानता दुर करणारे केंद्र निर्माण केले जावेत.

**८. सर्व क्षेत्रमध्ये स्त्रियांना समान संधी :—**

सर्वच क्षेत्रामध्ये पुरूषांच्या बरोबरीने समान संधी उपलब्ध करून देवून त्यांच्या बुध्दीमत्तेचा आणि कार्यक्षमतेचा वापर करून घेणे हे महिला सबलीकरण प्रक्रियेचे उद्दीष्ट आहे. स्त्रियांमध्ये बुध्दिमत्ता आणि कार्यक्षमता असून ही केवळ लिंगभेदावर आधारित विषम दृष्टीकोणामुळे स्त्रियांना संधी नाकारण्यात आली होती, समाजाचा एक मोठा घटक राष्ट्रीय विकाससाच्या प्रक्रियेपासून अलिप्त ठेवल्या गेल्यामुळे राष्ट्रीय विकासावर त्याचा निश्चितच विपरीत परिणाम झाला. परिणामी स्त्रियांना विकासाच्या सर्व क्षेत्रामध्ये समान संधी उपलब्ध करून देवून राष्ट्रीय विकासाला हातभार लावण्याचे महिला सबलीकरण प्रक्रियेचे उद्दीष्ट आहे. अशा प्रकारे महिला विरूध्द होणारे अपराधासाठी पुरूष प्रधान समाज, पुरूष मानसिकता आणि सामाजिक रूढी परंपरा जबाबदार आहेत.

**९. स्त्रियांचे खच्चीकरण थांबविणे :—**

स्त्रियांना दुय्यम आणि उपेक्षित वागुणक देण्यासाठी त्यांचे कार्यक्षेत्र केवळ चुल आणि मुल पुरतेच मर्यादित ठेवण्याची मानसिकता स्त्रियांच्या खच्चीकरणाला मुख्यत्वे जबाबदार आहे. ही मानसिकता स्त्रियांना पुरूषाच्या बरोबरीने विकासाच्या संधी नाकारते. समाजातील अशा मानसिकततेत बदल करून स्त्रियांचे खच्चीकरण थांबविणे.

**१०.स्त्रियांना उपेक्षीत ठेवणाऱ्या शक्तीचे मतपरिवर्तन :—**

स्त्रीयांना जाणीवपुर्वक उपेक्षीत ठेवणाऱ्या सामाजिक शक्तीमध्ये मत परिवर्तन घडवून आणणे हे देखील महिला सबलीकरण प्रक्रियेचे एक महत्वाचे घटक आहे. स्त्रीयांना गुलाम बनविणारी पुरूष प्रधान मानसिकता बदलण्यासाठी त्यांना नविन दिशा देण्यासाठी महिला सबलीकरण प्रक्रियेअंतर्गत प्रयत्न होतो. स्त्रीयांना दुय्यम लेखणारी मानसिकता बदलणे तिच्या सबलीकरणासाठी आवश्यक आहे. ही मानसिकता बदलण्यासाठी विविध औपचारीक — अनौपचारीक साधानाचा वापर होत असतो.

**संदर्भ सूची**

१. समकालीन जागतिक राजकारण — डॉ. शैलेंद्र देवळाणकर, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद — २०११ पृ. ३४४, ३४५
२. तत्रैव पृ. ३४६, ३४७
३. समकालीन जागतीक राजकारणातील प्रमुख समस्या ले. डॉ. ज.रा.शिंदे, डॉ. प्रशांत अमृतकर चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद पृ.क्र. १२९
४. महिला सशक्तीकरण — रमा शर्मा, एम.के. मिश्रा, अर्जुन पब्लिशिंग हाउस नई दिल्ली पृ क्र.१०,११, १२
५. Griffen Vahsssa(ed) women’s Development and Empowerment, A Pacific Development Center, Kula Lumpur. 1987 P.117-118
६. Government of India, Fourth World conferanc of Women, Beijing 1995, Development ministry of Human Resource and Development n. Delhi- 1995 P. 116
७. Kapur Pramila, Family Social Human and Spiritula Values for Women’s Empowerment and gender equality through Empowerment stratagies and approaches. Lacknow, India 1997
८. Nath Kamla and Milly chattrjer 1996 why women? What politics center for social Research N.Delhi P.4